गुन्हेगारी-घटनेस वाचा फोडुन झुंज देणारे एकमेव दैनिक

# दैनिक झुंजार जनता

R.N.I. No.MAHMAR/2022/82590 Mo. 8180068180

* औरंगाबाद / महाराष्ट्र | वर्ष : ३ | मंगळवार दि .२२/१०/२०२४ | अंक ३० | पाने ४ | किमत ४ रु

**।।सुविचार।।**

कर्ज फेडता येत रे, उपकार नाही. मातृभूमी हे मातेसारखेच पवित्र आणि सर्वश्रेष्ठ दैवत आहे.

# तामसा परिसरातील ग्राहकांची पसंती उमरीच्या सोन्याचांदीच्या दागिण्याला...

संतोष डवरे,हदगाव:- येत्या काही दिवसांवर भारतात मोठया उत्साहात साजरा केला जाणारा सण म्हणून दीपावलीचा सण हा महत्वाचा असतो त्यात सोनं चांदीच्या दागिने खरेदी करण्यासाठी महिलांची मोठी गर्दी होत असते, पण तामसा परिसरातील ग्राहकांची पसंती मात्र भोकर च्या बाजूस असलेल्या स्टेशन उमरी व हदगाव बाजूस असलेल्या उमरखेड येथील सोन्या चांदीच्या दागिन्यांचा खरेदीसाठी होत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.प्रामुख्याने जिल्हयातील जवळपास च्या परिसरासह आंध्र प्रदेश आणि तेलंगणा येथून सुद्धा उमरी च्या सोन्या चांदीच्या दागिन्यांची मोठया प्रमाणावर खरेदी - विक्री होत असल्याने साहजिकच तामसा परिसरातील महीला ग्राहकांची पसंती होत आहे. उमरी व उमरखेड येथील सोन्या चांदीच्या दागिण्याला विशेष व आकर्षित झळाळी असल्याने तिकडे जाण्यास कल वाढतो आहे. सोयाबीन काढणी, कापूस वेचणी, आणि ईतर ही शेतीचे कामे भरपूर सूरू असल्याने महीला वर्गाच्या हाती चार पैशांची आवक वाढली आहे त्यामुळे ईतर वायफळ खर्च न करता आपल्या लेकरांच्या भविष्यात किंवा अन्य वेळी पैसे ऊपलब्ध व्हावे यासाठी थोडफार सोन,चांदी घ्यावे तसेच त्याचा अलंकार म्हणून वापर करता यावा म्हणून सद्या याकडे महीला वर्ग आकर्षित होत आहे,

> ''आपला घामाचा पैसा खर्चून आपण दर्जेदार सोन चांदीचे दागिने खरेदी करावे, नाही तर पैश्यासारखा पैसा देऊन अन्य धातूच्या मिश्रणाचे दागिणे खरेदी करण्यापेक्षा चार पाऊल दूर जाऊन खरेदी करण्यास काय हरकत असावी अशी धारणा तामसा परिसरातील महीला ग्राहकांची झाल्याने उमरी व उमरखेड बाजारपेठेत असलेल्या सोन्या चांदीच्या दागिण्यास अधिक झळाळी असल्याने मात्र गर्दी तिकडे वाढत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.''

त्यामुळे अतिशय जुन्या काळापासून येथील सोन्या चांदीच्या दागिन्यांचा दर्जा हा उच्च प्रतीचा असल्याचे ग्राहक सांगतात. यात सोन्याची किंमत ही त्याच्या गुणवत्तेवर आधारित असल्याने त्याची एक विशिष्ट पद्धती अस्तित्वात आहे, त्याचं बरोबर केंद्र सरकारच्या सर्टिफिकेशन ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड्स (इखड) ने सोन्याची शुद्धता राखण्यासाठी काही मानके तयार केली आहेत, ज्यावरून सोन्याची शुद्धता ओळखली जाते.

१)सोन्यात हॉलमार्क आढळलाच पाहिजे.

२) सोने तपासण्यासाठी चुंबक चाचणी सुद्धा वापर केला जातो त्यात सोन्याच्या वस्तूजवळ चुंबक वापरून देखील त्याची शुद्धता तपासली जाऊ शकते,खरे सोने चुंबकीय नसते .हे खरे सोने आणि कृत्रिम सोने यांच्यातील फरक ओळखण्यास मदत करते ३) एक पद्धती स्क्रॅच टेस्ट:- सिरेमिक प्लेटवर सोने घासून घ्या. मूळ सोने सोनेरी लकीर सोडते, तर कृत्रिम सोने एक काळा किंवा राखाडी चिन्ह सोडू शकते. ४)सोन्याची शुद्धता तपासण्याचा हा सर्वात सोपा मार्ग आहे, यासाठी तुम्हाला तुमचे दागिने काही काळ दातांवर दाबावे लागतील. जर तुमच्या दागिन्यांवर थोडासा खूण असेल, तर याचा अर्थ ते खरे सोने आहे, कारण सोने हा एक मऊ धातू आहे, जो सहज चिन्हांकित करतो. सोने हा मऊ धातू असल्याने त्याला ताकद देण्यासाठी काही प्रमाणात इतर धातू मिसळले जातात.या सर्व बाबींचा विचार करता उमरी येथील सोन्या चांदीच्या दागिन्यांला तामसा सह परिसरातील महिलांची ओढ उमरी व उमरखेड बाजारपेठेत असल्याने तिथे अलोट गर्दी वाढत आहे.



## सावित्रीबाई फुले विद्यालयाच्या विद्यार्थिनींची पथनाट्यातून मतदार जनजागृती ! जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केले कौतुक ! 'स्वीप ' कार्यक्रमांतर्गत लोकशाहीचा जागर !



**सोयगाव तालुका.. प्रतिनिधी दिलीप मोरे-** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काल रविवारी ( ता . २० ) पंचायत समिती जामनेर येथे 'स्वीप ' उपक्रमांतर्गत महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी 'लोकशाहीची दिंडी ' हे मतदान जनजागृती पथनाट्य सादर केले . जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्यासह प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या विद्यार्थ्यांनीचे रोख पारितोषिक देऊन कौतुक केले . यात इ . ९ वी तील हर्षदा अनिल क्षीरसागर , प्रणिता समाधान क्षीरसागर ,मुनिराबी खलील शेख , गायत्री दीपक जवखेडे , कल्याणी गणेश धनगर , माहेश्वरी संजय धनगर , गायत्री योगेश पवार या विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला . त्यांना शाळेचे सांस्कृतिक प्रतिनिधी शंकर भामेरे यांचे मार्गदर्शन लाभले .याप्रसंगी तहसीलदार नानासाहेब आगळे उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय येरुळे , गटविकास अधिकारी श्रीकृष्ण इंगळे , पोलीस निरीक्षक सचिन सानप , उपशिक्षणाधिकारी विजय सरोदे , नोडल अधिकारी संदीप पाटील यांच्यासह महसूल , शिक्षण , गृह विभागातील अधिकारी , कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते . शाळेच्या मुख्याध्यापिका व्ही . व्ही . घोंगडे , उपमुख्याध्यापिका कल्पना बनकर यांच्यासह शिक्षकांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले .

## मनोज जरांगे पाटील यांच्या बद्दल आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या त्या युवका विरुद्ध गुन्हा दाखल



**सोयगाव तालुका प्रतिनिधी दिलीप मोरे सोयगाव;-** शहरातील सोशल मीडिया च्या एका समूहावर मराठा समाजाचे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या बद्दल सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल करणाऱ्या त्या युवकाविरुद्ध गुरुवारी रात्री अकरा वाजता सोयगाव पोलीस ठाण्यात अखेर गुन्हा दाखल करण्यात आला आहे शहरात सोशल मीडियावर संतोष नाना भामरे(रा आमखेडा सोयगाव वय ४६) यांनी गुरुवारी सायंकाळी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या बद्दल आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल केल्या चा प्रकार उघडकीस आला होता त्यामुळे मराठा समाजाच्या संतप्त तरुणांनी रात्री नऊ वाजेपर्यंत सोयगाव पोलीस ठाण्यासमोर ठिय्या मांडला होता व संबंधित विरुद्ध कारवाई ची मागणी केली दरम्यान मराठा तालुका समन्वय विजय काळे यांनी रात्री सोयगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून संतोष भामरे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार राजू बर्डे,रविंद्र तायडे, अजय कोळी,दिलीप पवार,गजानन दांडगे आदी करत आहे..

## मुरुड येथील अवैध वृक्षतोड करणाऱ्यावर कार्यवाही करा : भीम क्रांती संघ खपले



**दत्ता गोरे लातूर/ जिल्हा प्रतिनिधी मुरुड-** दि.२१ आज रोजी शासन व केंद्र शासन तसेच पर्यावरण मित्र म्हणतात एकीकडे झाडे लावा झाडे जगवा आणि लावलेले झाडे तोडायचं काम मुरुड मधील नराधम करीत असल्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे व तो मुरुड मध्ये होताना दिसत आहे त्यामध्येच आज मुरुड येथील अवैध वृक्षतोड करणाऱ्यावर कार्यवाही करण्यासंदर्भात भीम क्रांती संघाच्यावतीने मुरुड पोलीस स्टेशनला निवेदन दिले आहे दिलेल्या निवेदनात विस्तृत असे म्हटले आहे की अज्ञात व्यक्तीने मुरुड येथील रमाई नगर सम्राट अशोक चौकात गेल्या सहा महिन्यापूर्वी वृक्ष लागवड करण्यात आली होती वृक्षाचे महत्व जाणून संघटनेच्यावतीने विविध जातीचे वृक्ष लावण्यात आले होते कदंबा नावाचे झाड काल दिनांक २० ऑक्टोंबर २०२४ रोजी अज्ञात व्यक्तीने तोडले आहे हे झाड वीस फुटाचे होते या अज्ञात व्यक्तीचा शोध घेऊन त्याच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी असे भिम क्रांती संघाचे संस्थापक अध्यक्ष जयदीप सुरवसे यांनी मुरुड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उजगारे यांची भेट घेऊन निवेदन दिले आहे.

## वंचित बहुजन आघाडीकडून माजी नगर सेवक अयाज शहा यांची उमेदवारी जाहीर



**कन्नड :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष एड. प्रकाश आंबेडकर यांनी येत्या शनिवारी, १९ ऑक्टोबर रोजी आगामी विधानसभा निवडणुकीसाठी १६ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. त्यातच कन्नड-सोयगाव विधानसभा मतदारसंघातून माजी नगरसेवक अयाज मकबूल शहा यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली. अयाज शाह हे त्यांच्या प्रभागातील विविध विकासकामे आणि त्यांच्या सामाजिक कार्यासाठी कन्नडमध्ये ओळखले जातात. शहा यांची उमेदवारी जाहीर होताच अधिकारी, कामगार व त्यांच्या चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले.

वैंजापूर-गंगापूर विधानसभा मतदारसंघातील मौंजे ''पारळा, पानवी खंडाळा,पानवी खुर्द,जिरी-मनोली'' येथील

## शिवसैनिकांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात जाहीर प्रवेश केला

गंगापुर प्रतिनिधि हारून पठान

यावेळी मा सरपंच नानासाहेब सूर्यवंशी, व्हा. चेअरमन सुभाष सूर्यवंशी, राजेंद्र सूर्यवंशी, ज्ञानेश्वर मोरे,लहानु ठाकरे, महादू मोरे, पुंजाराम ठाकरे, भाऊलाल पवार, राजेंद्र सोनवणे,रामदास भागवत, सोमनाथ मोरे,बाबुलाल ठाकरे, कैलास मोरे,कैलास राठोड, भाऊलाल पवार, चंद्रकांत मोरे, जगन बावचे, ज्ञानेश्वर बावचे,अजय भालेराव,अंकुश वाघ, संतोष सोमासे, आप्पासाहेब बावचे, उपसरपंच सोमनाथ बावचे, भागिनाथ मुंढे, किशोर बावचे, संजय बावचे, गोरख तुपे,अर्जुन मलिक, व्यंकट तुरकने, भरत शिलोटे, शरद शिलोटे, रावसाहेब मलिक,दीपक तूरकने, बापू महाडिक, सचिन तुरकणे, पंकज त्रिभुवन,योगेश तुपे, शांताराम तुपे,संदीप मलिक,यांचा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश झाला.



## शिवसेनेचा गंगापूर तालुक्यातील ५३ गांवातील कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन



गंगापूर (प्रतिनिधी) हारुन पतनगंगापूर वैजापूर ११२ विधानसभा मतदारसंघ निवडणूकीची पूर्व तयारीसाठी शिवसेना-भाजपा-राष्ट्रवादी महायुतीचा शिवसेना कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन गंगापूर वैजापूर रोडवरील शिवपार्वती लॉनवर २२ आक्टोंबर रोजी सकाळी १० वाजता घेण्यात येणार आहे.

शिवसेना-भाजपा राष्ट्रवादी महायुतीचा गंगापूर तालुक्यातील ५३ गांवातील कार्यकर्ता मेळाव्यासाठी महायुतीचे विधानसभेचे उमेदवार रमेश बोरणारे हे मार्गदर्शन करणार आहे या मेळाव्याला शिवसेना-भाजपा-राष्ट्रवादी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी गंगापूर वैजापूर रोडवरील मांजरीपाटीवरील शिवपार्वती लॉन्स येथे उपस्थित रहावे असे आवाहन वैजापूर गंगापूर शिवसेना, युवासेनेच्या वतीने करण्यात आले आहे.

************

## नरसिंह शेळगाव येथे शेतात काम करत असताना अचानकपणे वीज पडून शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू..!



**दैनिक झुंजार जनता देगलुर तालुका प्रतिनिधी सायलु कृष्णापुरे/देगलूर:-** तालुक्यातील नृसिंह शेळगाव येथे शेतकरी युवक शेतात फवारणीसाठी गेले असताना अचानकपणे अंगावर वीज कोसळल्याने एका शेतकऱ्याचे जागीच मृत्यू झाला आहे. बसवंत मारोती गुडफळे (वय ४०) असे मयत शेतकऱ्याचे नाव आहे.बसवंत मारोती गुडफळे नेहमीप्रमाणे रोजंदारीच्या कामासाठी फवारणी करण्यासाठी गेले असता आज दि. २१ ऑक्टोंबर रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास अचानकपणे विजेच्या कडकडासह पावसाला सुरुवात झाली व त्यातच ही दुर्घटना घडली.या दुर्घटनेमुळे देगलूर तालुक्यातील नृसिंह शेळगाव येथील गुडफळे परिवारावर शोककळा पसरला असून प्रशासनाकडून यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळावी अशी सर्व गावकऱ्यांनी मत व्यक्त केले.

> **शहापूर सर्कल मध्ये धक्कादायक घटना वीज कोसळून शेतकऱ्यांची दुर्दैवी मृत्यू**

## बंजारा समाजाच्या राज्यव्यापी बैठक संपन्न...!

### पक्षाने न्याय द्यावा अन्यथा वेगळा पर्याय – देविदास राठोड

**दैनिक झुंजार जनता... नांदेड जिल्हा प्रतिनिधी मारोती कुडकेवार**

नांदेड:- मागील तीन दशकांपासून भाजप पक्षात '' तन मन धन'' काम करणारे भाजप चे प्रदेश सचिव देविदास राठोड यांना विधान परिषदेसाठी डावलण्यात आले. नांदेड लोकसभेच्या पोटनिवडणुकीसाठी भाजपाने देवीदास राठोड यांना उमेदवारी द्यावी अन्यथा वेगळा विचार करू, असा इशारा माजी खासदार हरीभाऊ राठोड यांनी दिला आहे.

नांदेडमध्ये बंजारा क्रांती दलाकडून बंजारा समाजाची राज्यव्यापी बैठक २० ऑक्टोबर रोजी बोलावण्यात आली होती. समाजाच्या बैठकीत हरीभाऊ राठोड यांनी भाजपाला इशारा दिला. देविदास राठोड तीस वर्षापासुन भाजपाचे काम करतात. त्यांना न्याय मिळाला नाही तर समाज भाजपा सोडून अन्य पर्यायाचा विचार करेल असे हरीभाऊ राठोड म्हणाले. दरम्यान पक्षाने आता लोकसभा पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी द्यावी, आपण पोटनिवडणूक लढण्यास तयार आहोत असे भाजपाचे राज्य सचिव देविदास राठोड म्हणाले. समाजाचे शिष्टमंडळ पक्ष नेत्यांना भेटणार आहे. पक्षाने न्याय दिला नाही तर वेगळा विचार करू असे मत देविदास राठोड यांनी व्यक्त केले.

सिडको भागातील वासवी क्लब मंगल कार्यालयात २० ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या बंजारा समाजाच्या राज्यव्यापी बैठकीत बंजारा समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करत आमचा समाज देविदास राठोड यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सांगितले.

मागील काही दिवसापूर्वी भाजप ने राज्यपाल नियुक्त आमदार म्हणून बाबुसिंग महाराज यांना घेण्यात आहे.गेल्या तीन दशकांपासून देविदास राठोड यांनी पक्षाचे काम करीत आले आहेत तरी पण त्यांना डावलून समाजाच्या मतासाठी महाराजांना देण्यात आले परंतु त्यांचा तो गैरसमज आहे. बंजारा समाजाची काशी म्हणून पोहरादेवी देवस्थानास ओळखले जाते तसेच संपूर्ण भारतवर्ष चे गुरू म्हणून त्यांच्या बघितल जात मग ते गुरी जर राजकारण करत असेल तर आम्ही आमचा समाज कोणाच्या पायाखाली झुकू देणार नाही असे संतप्त मत विशाल पवार यांनी व्यक्त केले.





## कन्नड विधानसभा निवडणुकीसंदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पूर्ण ताकदीने निवडणूक लढणार

### तहसील अध्यक्ष अनिल शेळके यांनी रविवारी पत्रकारांशी चर्चा केली.




**कन्नड-** कन्नड विधानसभा मतदारसंघातील उमेदवारीबाबत रविवारी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची आढावा बैठक झाली. यासंदर्भात मनसेचे तहसील अध्यक्ष अनिल शेळके यांनी पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्वबळावर पूर्ण ताकदीने विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी सांगितले. कन्नड-सोयगाव विधानसभा मतदारसंघातून यापूर्वी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे आमदार राहिले आहेत, त्यामुळे येथील लोकांचा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याशी खूप संबंध आहे. विधानसभा मतदारसंघातील जनतेचा राज ठाकरे यांच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास आहे. यावेळी नवनिर्माण सेनेतर्फे प्रा.लखन चव्हाण यांना उमेदवारी देण्याची शक्यता असल्याचे शेळके यांनी सांगितले. २२ ऑक्टोबरनंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या उमेदवारांची यादी जाहीर करण्यात येणार असल्याचे शेळके यांनी सांगितले.

## सरस्वती विद्यालय राजेगाव च्या खेळाडूंचे शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये घवघवीत यश...



**संतोष डवरे,माजलगाव :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे द्वारा जिल्हा क्रीडा परिषद बीड, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड विघमाने आयोजित शालेय विविध स्पर्धेमध्ये सरस्वती विद्यालय राजेगाव मधील खेळाडूंनी विविध स्पर्धेमध्ये यश संपादन केले आहे. वर्ष वयोगट १७ वर्ष मुली व वयोगट १४ वर्षे मुली यांनी शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ या कालावधी मध्ये घेण्यात आलेल्या मैदानी, खो-खो स्पर्धेत तालुक्यात अव्वल, जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक पटकावला व पाच खेळाडूंची विभागीय निवड चाचणी मध्ये निवड झाली तसेच आट्यापाट्या खेळामध्ये जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक पटकन हिंगोली येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्याचे नेतृत्व करणार आहेत. सर्व खेळाडूंच्या पुढील वाटचालीसाठी संस्थेचे अध्यक्ष माननीय राधाकृष्ण होके पाटील सचिव अशोक होके पाटील व शालेय समितीचे अध्यक्ष बाळू कारभारी उपाध्यक्ष विजय साळवे व शालेय समितीचे सर्व सदस्य तसेच शाळेची मुख्याध्यापक अशोक कचरे सर यांनी खेळाडूंना शुभ आशीर्वाद देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. वयोगट १४ वर्ष मुली संघामध्ये शिवानी कचरे, सय्यद अनम, राठोड जयश्री, घाटूळ अक्षरा, राठोड विद्या, पवार प्रियंका, गरड भक्ती, पवार पल्लवी, खरात दिव्या, साळवे रोशनी, कोकाट अनुजा, शेख आयशा, साळवे अक्षरा, वं १७ वर्षे वयोगट मुली च्या संघात गरड राजश्री, गरड समीक्षा,पवार पल्लवी, डबलवार साक्षी,कचरे नंदिनी,सय्यद अल्फिया, शेख आयेशा, साळवे प्रीती, कचरे अक्षरा,कचरे प्रतीक्षा, नाईकनवरे दुर्गा, गरड श्रुतिका, पवार अरुणा, जाधव दीक्षा, या सर्वांनी नितीन पुटवाड वं मनीषा कचरे यांच्या मार्गदर्शन खाली तालुका जिल्हा विभाग स्तरापर्यंत आपले कौशल्य दाखवले व विजय मिळवून आणला याबद्दल शाळेतील शिक्षक गणेश महाजन, तुकाराम चौरे, अशोक रोडगे, दीपक कवडे, सुरेश सोळंके, विशाल सोळंके, पद्माकर शिंदे, अमर राऊत, अविनाश जाधव, ओमप्रकाश कचरे, रवींद्र साळवे व सर्व राजेगाव व सुरडी मधील सर्व गावकऱ्यांनी शुभेच्छा पर आशीर्वाद दिला.

## नगर घुले महाविद्यालयात कॅम्पस मुलाखती पंधरा विद्यार्थ्यांची निवड

**नगर :** जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे, मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर येथे महाविद्यालयातील पदवीधर माजी विद्यार्थ्यांसाठी प्लेसमेंट सेल विभाग व आय.बी.एफ. स्किल्स अकॅडमी,कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१८ ऑक्टोबर २०२४ रोजी मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. या मुलाखती घेण्यासाठी कोल्हापूर येथील आय.बी.एफ. स्किल्स अकॅडमीचे असिस्टंट मॅनेजर स्वरूप कारंडे उपस्थित होते.या मुलाखती आय.सी.सी. आय, बंधन, युनिटी, ॲक्सेस,मुथुट फायनान्स,एच. डी.एफ.सी.बँक या बँकेतील विविध पदासाठी मुलाखती घेण्यात आल्या. या नोकरी मेळाव्यात ७२ पदवीधर माजी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून प्रत्यक्ष मुलाखतीतून अनुक्रमे विद्यार्थी प्रीतम गायकवाड,मनीष मोहिते,श्वेता बडे,अनिकेत गोत्राल,आशिष केदारी,ऋषिकेश सदावर्ते, शिवतेज तोडमल,अथर्व उनवणे,सायली साळवे,शीतल सिंग,कार्तिक उनवणे,आरती शेलार,सोनाली गायकवाड, माधुरी शिंदे,दिपाली होडगर या १५ विद्यार्थ्यांची ट्रेनिंग साठी निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.के.पंदरकर यांनी दिली.या विद्यार्थ्यांना मेलच्या साह्याने नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आल्याची माहिती आय.बी.एफ. स्किल्स अकॅडमीचे असिस्टंट मॅनेजर स्वरूप कारंडे यांनी दिली आहे.या निवडीमध्ये वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने निवड झाली आहे.या मुलाखत घेण्यासाठी माजी विद्यार्थी संघ प्रमुख प्रा.श्रीराम मरकड,वाणिज्य शाखाप्रमुख प्रा.पुरुषोत्तम फटांगरे,प्लेसमेंट सेल समन्वयक प्रा.सौरभ शिंदे,सहाय्यक प्रा.कीर्ती कराड, प्रा.जयश्री दळवी,प्रा.नसरीन शेख,प्रा.वैष्णवी लबडे,ओ.एस. श्री.प्रवीण दळवी,सना शेख, ऋतिक ताकपेरे,अल्तमश शेख यांचे सहकार्य मिळाले.या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा.आ. डॉ.नरेंद्र घुले पाटील, सचिव,मा.आ.चंद्रशेखर घुले पाटील,संस्था विश्वस्त मा.नामदार सौ.राजश्रीताई घुले पाटील, शेवगाव पंचायत समिती माजी सभापती,डॉ. क्षितिज घुले पाटील,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.के. पंदरकर,प्रशासकीय अधिकारी के.वाय.नजन, संस्था समन्वयक विजय काशीद, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.के.आर.पिसाळ व प्राध्यापक यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले.

***********

## नोकरी हे पोट भरण्याचे साधन आहे - रामदास पेंडकर तानुरकर

**दैनिक झुंजार जनता...**
**नांदेड जिल्हा प्रतिनिधी मारोती कुडकेवार**



**नांदेड:-** भावसार मल्टी सर्विसेस सेंटरचे तरोडा नाका नांदेड येथे शुभारंभ प्रसंगी भावसार सेनेचे संस्थापक अध्यक्ष रामदास पेंडकर आपले विचार व्यक्त करताना म्हणाले नोकरी हे पोट भरण्याचे साधन आहे, व्यवसाय,बिजनेस करणारे स्वतः मालक असतात इतरांच्या हातांना काम देण्याची ताकद, अनेक कुटुंबाचे चूल पेटवण्याची ताकद,समाजसेवा करण्याची ताकद व्यवसायिकामध्ये असते म्हणून व्यवसायिक,बिजनेसमॅन हा स्वतः मालक असतो असे विचार व्यक्त करून भावसार यांच्या पुढील व्यावसायिक कार्यास हार्दिक शुभेच्छा दिले.पहेलवान ग्रुपचे अध्यक्ष अभिषेक ताकझुरे यांनी आपले विचार व्यक्त करताना म्हणाले व्यवसाय,धंदा,बिजनेस हेच मनुष्याच्या जीवनातील आर्थिक प्रगतीचे साधन आहे त्यासाठी नवयुवकांनी व्यवसायाकडे विशेष लक्ष देऊन व्यवसाय केले पाहिजे. भावसार बंधू आणि भगिनी,मित्र मंडळ तसेच अनेक मान्यवर प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत भावसार मल्टीसर्विसेस सेंटरची संचालक विपुल भागवत यांची मातोश्री ग.भा.मंगलाबाई अरुणराव भागवत यांच्या शुभहस्ते १७ ऑक्टोंबर२०२४ रोजी भावसार मल्टीसर्विसचे शुभारंभ करण्यात आले. याप्रसंगी श्री सत्यनारायणाची पूजा व महाआरती करण्यात आली त्यानंतर उपस्थित सर्व पाहुणे मंडळी,मित्र मंडळ यांचे स्वागत करून अल्पहार व प्रसादाचे वाटप करण्यात आले यावेळी भावसार सेनेचे सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने भावसार मल्टीसर्विसेस सेंटरचे संचालक विपुल भागवत यांचे शाल,श्रीफळ,भावसार गौरव गाथा, झेंडा देऊन भव्य दिव्य सत्कार करण्यात आले. सौ सारिका बर्डे,श्रीमती साधनाताई उखळे,रमेश पूरनाळे,संदीप बेंद्रे गणेशजी मुधोळकर, राजेश परनाळे ,राजेश भडके ,शंकर सोनवणे,कारामुंगे तसेच पहिलवान ग्रुपचे अध्यक्ष अभिषेक ताकझुरे मित्र मंडळ अनेक बंधू आणि भगिनी उपस्थित होते.

## विजय रणखांब यांचा कोल्हापूरात राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने सन्मान...!





**दैनिक झुंजार जनता...**
**नांदेड जिल्हा प्रतिनिधी मारोती कुडकेवार**

**नांदेड:-** मागील अनेक वर्षांपासून समाजकार्यात झोकून दिलेले बहुजन शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष,वीज कर्मचारी संघटना,लसाकम, राज्य गुणवंत कामगार असोसिएशन व वीज कामगारांच्या हितासाठी लढा देणारे आणि सामाजिक,कर्मचारी संघटना व विविध क्षेत्रात काम करणारे नांदेड जिल्हा लसाकमचे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरी बदल त्यांच्या कार्याची दखल घेऊन राज्य गुणवंत कामगार असोसिएशन महाराष्ट्र व जागृत नागरिक सेवा संस्था कोल्हापूर च्या वतीने राज्यस्तरीय २०२४ चा समाज भूषण पुरस्कार राज्य गुणवंत कामगार असोसिएशनचे नांदेड जिल्हा सचिव विजय रणखांब यांना दिनांक १४ ऑक्टोबर रोजी राजश्री शाहू स्मारक भवन, कोल्हापूर येथे माजी मंत्री तथा विद्यमान आमदार सतेज उर्फ बंटी पाटील विरोधी पक्ष गटनेते विधान परिषद महाराष्ट्र यांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल श्रीफळ तसेच कोल्हापुरी फेटा देऊन सपत्नीक सन्मानित करण्यात आले.यावेळी मा. रविराज इळवे ,आयुक्त महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मा. विशाल घोडके सहाय्यक कामगार आयुक्त कोल्हापूर यांची प्रमुख उपस्थिती होती.सामाजिक कार्यात झोकुन देणारे सामाजिक,पत्रकारिता, कामगार क्षेत्रातील अनुभवी अष्टपैलू व्यक्तिमत्व विजय रणखांब यांनी विविध क्षेत्रात केलेले कार्याचा गौरव राज्य स्तरीय समाज भूषण पुरस्कार देऊन करण्यात आला.यावेळी सत्कार ला उत्तर देताना विजय रणखांब यांनी आपण सामाजिक बांधिलकी म्हणून सामाजिक कार्य म्हणजे ही एक सेवा आहे आणि आपण ती सेवा केली पाहिजे. आपण समाजातील जबाबदार असल्याने समाजाप्रती काम करण्याची तळमळ असणे महत्त्वाचे आहे पुरस्कार हे प्रेरणा देतात बळ देतात, ऊर्जा देतात,आणी अजून आपली जबाबदारी वाढली आहे म्हणून समाजातील शोषित पिडीत,वंचितांसाठी कामगारासाठी आपण लढत असल्याने सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे विजय रणखांब यांनी सांगितले. रणखांब यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

**********

## तलवाडा बस स्थानकाचे काम दर्जाहीन काम उरकण्याची गुत्तेदराची घाई ;

### महांमंडळ वरिष्ठ अधिकारी अभियंता लक्ष देतील का ?

**बीड / प्रशांत बाफना**

गेवराई तालुक्यातील तलवाडा याठिकाणी एस टी बस स्थानकाचे काम सुरू असून अत्यंत दर्जाहीन काम सुरू असल्याने याकडे एस टी महामंडळाचे अधिकारी ,अभियंता यांनी लक्ष देण्याची गरज असल्याची चर्चा तलवाडा परिसरात असून गुतेदार हा काम उरकून घेण्याच्या घाईत आहे त्यामुळे कामाचं दर्जा पाहिजे तसा राहणार नाही याची खंत प्रवाशी बोलून दाखवत आहेत

गेवराई तालुक्यातील तलवाडा याठिकाणी बस स्थानकामध्ये बस गाड्या उभ्या राहतात या ठिकाणी सिमेंट काँक्रिट चे काम सुरू आहे याठिकाणी सिमेंट काँक्रिट चे तीन स्थर टाकण्यात येत आहेत परंतु पाहिले खोदकाम करून खडी टाकण्यात आली ती व्यवस्थित दबाई करण्यात आली नाही तसेच जे पहिले काँक्रिट टाकले त्याला मुदत देवून पाणी मारणे आवश्यक आहे त्यामुळे त्याची मजबुती वाढली जाते परंतु तसे न करता कामात घाई करण्यात येत असून खाली थातुर मतुर सिमेंट काँक्रिट करून त्यावर लगेच दुसरा स्थर् टाकण्याचे काम झाले आहे त्यामुळे काम दर्जाहीन होणार अशी शंका प्रवाशांनी आणि तलवाडा येथील ग्रामस्थांनी बोलून दाखवली असून यामध्ये लोखंडाचा वापर किती,सिमेंट कोणत्या ग्रेड चे वापरण्यात येते याकडे एस टी महा मंडळाचे अभियंता लक्ष देतील का असा प्रश्न निर्माण केला जात असून कामाचा दर्जा वाढण्याची गरज असल्याचे बोल ले जाते याकडे वरिष्ठांनी लक्ष देवून काम दर्जेदार करण्यासाठी गुत्तेदारांना सूचना कराव्यात अशी मागणी होत आहे.

***********

## तीन दशकांपासून महाराष्ट्रात एकपक्षीय सरकार नाही

**मुंबई :** महाराष्ट्रातील सध्याचे विभाजित राजकारण हे राजकीय विश्लेषकांसाठी गुंतागुंतीचे आणि आव्हानात्मक ठरले आहे हे नक्की. पण तसे पाहिल्यास मागील जवळपास तीस वर्षांपासून राज्यात एकपक्षीय सरकार आलेले नाही.

१९९५ पासून विविध पक्षांनी बनलेल्या आघाड्याच राज्यात सत्तेत आल्या आहेत. गेल्या पाच वर्षांत आश्चर्यकारक फेरबदल पाहायला मिळाले आहेत ज्यामध्ये पूर्वी एकमेकांचे मित्र असलेले पक्ष शत्रू झाले आहेत आणि एकमेकांचे कट्टर विरोधत आता मित्र बनले आहेत.

राज्यात शेवटचे एकपक्षीय सरकार १९९० मध्ये सत्तेवर आले होते. त्यावेळी काँग्रेसने १४१ जिंकल्या होत्या. काँग्रेसला साध्या बहुमतापासून जरी वंचित रहावे लागले असले तरी राज्यातली सत्ता राखता आली होती. त्या निवडणुकीत भाजपने ४२ आणि शिवसेनेने ५२ जागा जिंकल्या होत्या. महाराष्ट्रात आघाडीच्या युगाला सुरूवात झाली ती १९९५ पासून. शिवसेना-भाजप युतीने त्यावेळी काँग्रेसच्या प्रभुत्वाचा अंत करून राज्यात सरकार स्थापन केले होते. १९७८ पर्यंत महाराष्ट्र हा काँग्रेसचा बालेकिल्ला होता. १९६२ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर झालेल्या पहिल्या निवडणुकीत काँग्रेसने २६४ पैकी २१५ जागा जिंकून सत्ता मिळवली. १९७२ मध्ये काँग्रेसने २७० पैकी २२२ जागा जिंकल्या.

बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेनेने १९७२ मध्येच एक जागा जिंकून राज्याच्या विधानसभेत प्रवेश केला. १९७८ मध्ये विधानसभा सदस्यांची संख्या २८८ झाली. १९८० मध्ये 'इंदिरा काँग्रेस' १८६ जागा जिंकून पुन्हा सत्तेत आला. परंतु १९९५ मध्ये शिवसेना-भाजप युती सत्तेवर आल्याने काँग्रेसचे वर्चस्व संपले. यावेळी काँग्रेसच्या ४५ बंडखोर आमदारांनी स्वतंत्र उमेदवार म्हणून युती सरकारला पाठिंबा दिला.

१९९९ च्या निवडणुका काँग्रेसमधील फूट आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीच्या स्थापनेच्या पार्श्वभूमीवर झाल्या.

### १९७८ मध्ये पहिल्यांदाच आघाडी सरकार

वास्तविक पाहता, शिवसेना-भाजप युतीचे सरकार हे काही राज्यातील पहिले आघाडी सरकार नव्हते. १९७८ मध्ये आणीबाणीनंतर झालेल्या निवडणुकीत पहिल्यांदा राज्यात आघाडी सरकार सत्तेवर आले. आणीबाणीनंतर काँग्रेस पक्षात फूट पडली आणि काँग्रेस सिंडिकेट (ओ) आणि काँग्रेस (इंदिरा) या दोन गटांनी एकत्र येऊन पहिल्यांदा आघाडी सरकार स्थापन केले होते. शरद पवार हेही या सराकरचा भाग होते. कालांतराने पवारांनी बंड करून हे सरकार पाडले आणि काँग्रेसमधील एक गट, जनता पार्टी आणि इतर काही विरोधी पक्षांच्या आमदारांच्या पाठिंब्यावर सरकार बनवून पवार स्वत: मुख्यमंत्री बनले. इंदिरा गांधी यांनी पुन्हा केंद्रात सत्तेवर आल्यानंतर हे सरकार बरखास्त केले.



विधानसभा निवडणुकीचे पडघम

## आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांना नोटीस


### १,०६४ लाखांची मालमत्ता ताब्यात

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लागू झालेल्या आचारसंहितेच्या कालावधीत गैरव्यवहार रोखण्यासाठी कार्यरत राज्य निवडणूक आयोगाने गेल्या चार दिवसांत बेहिशेबी निधी, मद्य, अमली पदार्थ आदी साहित्य जप्त करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. यामध्ये सोशल मीडियावर १,७५२ आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांना नोटीस बजावल्याचे राज्य निवडणूक आयोगाकडून सांगण्यात आले.

राज्यात ठाणे जिल्ह्यातील सर्वात जास्त तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे.

१५ ते १८ ऑक्टोबर २०२४ पर्यंत राज्यभरात सी-व्हिजिज ॲपवर एकूण ४२० तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी ४१४ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत. त्यातील २५६ तक्रारींचा निपटारा १०० मिनिटांत करण्यात आला आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू झाल्यापासून अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेहिशेबी निधी, मद्य, अमली पदार्थ, मौल्यवान धातू आदी १,०६४ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.



### टेक डाऊनसाठी नोटीस

लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने सोशल मीडियावर निवडणुकीशी संबंधित प्रसारित होणाऱ्या खोट्या व मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करणाऱ्या पोस्ट/व्हिडीओवर संबंधित सोशल मीडियाचे प्लॅटफॉर्मचे नोडल ऑफिसर यांना कलम ७९ (३) (ब) अन्वये टेक डाऊन करण्यासाठी नोटीस बजावण्यात आली आहे.

| इंटरमीडिया | पोस्ट | डिलिट | पेंडिंग |
|---|---|---|---|
| फेसबुक | १४३ | १६ | १२७ |
| इंस्टाग्राम | २८० | २९ | २५१ |
| एक्स | १,२९६ | २५१ | १,०४५ |
| युट्यूब | ३१ | ५ | २६ |
| अन्य | २ | २ | ० |
| एकूण | १,७५२ | ३०३ | १,४४९ |

## गिरणी कामगारांचे पुनर्वसन करा - न्यायालय


**मुंबई :** गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांना मुंबईबाहेर विस्थापित करण्याऐवजी त्यांना मुंबईतील गिरण्यांच्याच जागेवर घरे द्या, असे निर्देश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले.न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकलपीठाने गिरणी कामगारांना १९८२ च्या संपाची चांगलीच झळ पोहचली आहे. याचा विचार करून व्यावहारिक आणि उदार धोरण ठेवून त्यांचे पुनर्वसन करा, अशा स्पष्ट शब्दांत न्यायालयाने राज्य सरकार व म्हाडाला बजावले.



कांबळे यांनी घराची सुरवातीची १० टक्के रक्कम न भरल्याने त्यांना मिळालेल्या घराचा ताबा म्हाडाने रद्द केला. त्याविरोधात कांबळे यांनी हाय कोर्टात याचिका दाखल केली. या याचिकेवर न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या समोर सुनावणी झाली.यावेळी न्यायालयाने राज्य सरकार आणि म्हाडाच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली.

कांबळे व त्यांच्यारख्या इतर गिरणी कामगारांनी संप काळात फार यातना सोसल्या आहेत. सरकारने त्या विचारात घेतल्या नाहीत, त्याची घरा साठी घरघर सुरू आहे.असे असताना मिळालेले घर रद्द करणे व्यवहारी ठरणार नाही. असे स्पष्ट करत राज्य सरकारला व्यावहारिक व उदार धोरण ठेवून गिरणी कामगारांचे पुनर्वसन करण्याचा आदेश दिला. तसेच याचिकाकर्त्या कांबळे यांना लोअर परेल येथील प्रकाश कॉटन मिलच्या जागेवरील इमारतीत घराचा ताबा देण्याचे आदेश म्हाडाला दिले.

## मागाठाणे मतदारसंघात तिरंगी लढत




**तेजस वाघमारे / मुंबई**

मागाठाणे विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे दोन्ही गट आणि मनसेच्या उमेदवारांमध्ये चुरस पाहायला मिळणार आहे. या मतदारसंघात सलग दोन वेळा आमदार राहिलेल्या प्रकाश सुर्वे यांच्यापुढे महाविकास आघाडी, मनसेचे आव्हान असेल.

मराठी भाषिक मतदारांचे प्राबल्य असलेल्या मागाठाणे मतदार संघात २००९ च्या विधानसभा निवडणुकीत आमदार प्रवीण दरेकर हे मनसेच्या तिकिटावर निवडून आले होते. राष्ट्रवादी काँग्रेसला रामराम करत यानंतर सुर्वे यांनी शिवसेनेत प्रवेश केला. २०१४ च्या निवडणुकीत शिवसेनेकडून उमेदवारी मिळवत सुर्वे पहिल्यांदा विधानसभेत पोहचले. यानंतरच्या २०१९ च्या निवडणुकीतही सुर्वे विजयी झाले. मात्र शिवसेनेत फूट पडल्यानंतर प्रकाश सुर्वे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेले. त्यामुळे या मतदारसंघात दोन शिवसेनेत जोरदार टक्कर पाहायला मिळणार आहे.

सुर्वे यांना महायुतीकडून उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात आहे. त्यामुळे सुर्वे यांना घेरण्याची तयारी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने सुरू केली आहे. विभागप्रमुख उदेश पाटेकर आणि ठाकरे गटाच्या प्रवक्त्या व उपनेत्या संजना घाडी या येथून लढण्यास इच्छुक आहेत. तर २०१९ च्या निवडणुकीत सुर्वे यांना जोरदार लढत दिलेले मनसेचे नयन कदम यंदा कामाला लागले आहेत. २०१९ च्या निवडणुकीत कदम यांनी ४१ हजार ६० मते घेतली होती. तर प्रकाश सुर्वे यांनी ९० हजार २०६ मते मिळवत विजय मिळवला होता. मराठी, हिंदी भाषिक मतदारांची संख्या मागाठाणे विधानसभेत अधिक आहे.

### मतदार

| | |
|---|---|
| पुरुष | १ लाख ६३ हजार २८२ |
| महिला | १ लाख ३८ हजार ५२ |
| तृतियपंथी | २ |
| एकूण | ३ लाख १ हजार ३३६ |

### मतदारसंघातील समस्या

- रखडलेला झोपडपट्टीचा पुनर्विकास
- मतदारसंघातील अपुरा पाणीपुरवठा
- सखल भाग होतो जलमय
- अरुंद रस्त्यांमुळे वाहतूककोंडी
- एसव्हीरोडला ९० फुटी रस्ता जोडण्याचे काम रखडले



दैनिक झुंजार जनता
मंगळवार दि .२२/१०/२०२४


# शीव, राजावाडी रुग्णालयांच्या पुनर्विकासाला मंजुरी

## तीन हजार कोटींच्या खर्चाची योजना

**मुंबई :** मुंबई महापालिकेचे शीव येथील लोकमान्य टिळक सर्वसाधारण रुग्णालय आणि घाटकोपर येथील राजावडी रुग्णालय यांच्या पुनर्विकासाच्या योजनेला महापालिकेने मंजुरी दिली आहे. त्यावर तीन हजार कोटी रुपये खर्च होणार आहेत.

शीव येथील लोकमान्य टिळक सर्वसाधारण रुग्णालयाच्या विस्तारीत इमारतींच्या पुनर्विकासाचे काम हाती घेण्यात आले आहे. दुसऱ्या टप्प्यातील हा पुनर्विकास असून १३ व १४ मजल्यांच्या एकूण चार इमारतींचे बांधकाम आणि दोन रुग्णालय इमारतींना जोडणारे पादचारी पूल आदी काम करण्यात येणार आहे. राजावाडी रुग्णालयाचाही पुनर्विकास केला जाणार आहे. या प्रकल्पांना विधानसभा निवडणूक आचारसंहितेआधी पालिकेची मंजुरी मिळाली आहे. या कामासाठी सुमारे तीन हजार कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

शीव येथील विस्तारीत १३ व १४ मजल्यांच्या एकूण चार इमारतींचे बांधकाम केले जाणार आहे. तर राजावाडी रुग्णालयाच्या जागेचा पुनर्विकास करून नवीन इमारत बांधली जाणार आहे. पूर्व उपनगरातील राजावाडी रुग्णालयावरील वाढलेला रुग्णांचा ताण लक्षात घेता या रुग्णालयाच्या जागेचा पुनर्विकास करून नवीन रुग्णालय इमारत बांधण्याचा निर्णय घेतला आहे. तळ घर, तळ मजल्यासह १० मजल्यांची इमारत बांधली जाणार असून यासाठी सुमारे ६६५ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. तब्बल १०२० खाटांचे हे रुग्णालय बांधले जाणार आहे. त्याचा फायदा येथील रुग्णांना होणार आहे.




### शीव रुग्णालय इमारत ते पादचारी पूल

शीव रुग्णालयातील २२३५ खाटांची १४ मजली मुख्य इमारत, ५७२ खाटांची १३ मजली इमारत, २१३ खाटांची १४ मजली इमारत, १३ मजली ओपीडी इमारत तसेच शीव रुग्णालय इमारत ते बराक भूखंड जोडणारे पादचारी पूल अशा स्वरुपाचे काम असणाऱ्या पुनर्विकास प्रकल्पाच्या कामांना विविध करांसह २४६२ कोटींचा खर्च येणार आहे. तर राजावाडी रुग्णालयाच्या इमारतीसाठी ६६५ कोटी रुपये असे दोन्ही रुग्णालय प्रकल्पांसाठी सुमारे तीन हजार कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

# दिवाळी, छट पूजेसाठी मध्य रेल्वे सज्ज

**मुंबई :** दिवाळी आणि छट पूजा सणांच्या निमित्ताने गर्दी लक्षात घेऊन आरामदायी प्रवास साध्य करण्यासाठी मध्य रेल्वेने आपल्या प्रवाशांसाठी एकूण ५७० विशेष ट्रेन सेवांची घोषणा केली आहे. ८५ विशेष ट्रेन्सची घोषणा करण्यात आली आहे जी या ५७० विशेष ट्रेन सेवा पूर्ण करतील. त्यापैकी ४२ सेवा आधीच पूर्ण केल्या गेल्या आहेत.

या गाड्यांमध्ये वातानुकूलित विशेष, वातानुकूलित, शयनयान आणि जनरल डब्यांच्या मिश्र संयोजन असलेल्या गाड्या आणि अनारक्षित विशेष गाड्यांचा समावेश आहे. दिवाळी / छट पूजा उत्सव विशेष गाड्या मुंबई, पुणे, नागपूर इ. येथून देशभरातील विविध ठिकाणी चालवल्या जात आहेत. १०८ सेवा महाराष्ट्रातील लातूर, सावंतवाडी रोड, नागपूर, पुणे, कोल्हापूर, नांदेड आणि इतर ठिकाणी प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी मध्य रेल्वेद्वारे चालवल्या जात आहेत.

# सिद्दीकी यांच्या हत्येसाठी ५० लाखांची मागणी

## चौकशीदरम्यान आरोपींची कबुली

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची हत्या करण्यासाठी त्यांच्या मारेकऱ्यांनी ५० लाख रुपयांची मागणी केली होती अशी माहिती समोर आली आहे. परंतु पैशांच्या वाटाघाटीवरून हा सौदा फिस्कटल्यामुळे आरोपींनी माघार घेतली. शिवाय, बाबा सिद्दीकी सारख्या नेत्याचा राजकीय दबदबा पाहता आपण या प्रकरणातून अंग काढून घेतले, अशी कबुलीच अटक केलेल्या आरोपींनी चौकशी दरम्यान दिली असल्याचे पोलिसांनी सांगितले.

सिद्दीकी यांच्या हत्येप्रकरणी मुंबई पोलिसांनी नुकतीच आणखी पाच आरोपींना अटक केली होती. या आरोपींची चौकशी सुरू असून चौकशी दरम्यान आरोपींनी या हत्येसाठी आम्ही ५० लाख रुपयांची मागणी केली होती. परंतु सुपारीच्या रकमेवरून बोलणी फिस्कटली तसेच सिद्दीकी यांचा राजकीय वर्तुळातील दबदबा पाहता त्यांची हत्या केल्यास राज्यभर खळबळ माजेल याची कल्पना होती. त्यामुळे या प्रकरणातून आम्ही अंग काढून घेण्याचे ठरवले, असे या अटक केलेल्या आरोपींनी पोलिसांना सांगितले.

### आतापर्यंत एकूण ९ जण अटकेत

पोलिसांनी या हत्येप्रकरणी नीतिन सप्रे (३२), संभाजी पारधी (४४), प्रदीप ठोंबरे (३७), चेतन पारधी (२७) आणि राम कनोजिया (४३) या पाच जणांना अटक केली आहे. या आरोपींनी सिद्दीकींच्या मारेकऱ्यांना हत्येसाठी शस्त्रे पुरवली तसेच त्यांना आवश्यक ती माहिती पुरवली होती, असा पोलिसांचा आरोप आहे. या प्रकरणात आतापर्यंत एकूण ९ जणांना अटक करण्यात आली आहे.

## आचारसंहितेची कामे सुरू!



महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर आचारसंहिता लागू झाल्यामुळे भायखळा परिसरात पालिकेचे कर्मचारी भिंतींवरील राजकीय व्यक्तींची नावे पेपर लावून झाकत आहेत. (छाया : विजय गोहिल)

# सलमान झुरळालाही मारत नाही

## सलीम खान यांनी केली पाठराखण

**मुंबई :** सलमान खान झुरळालाही मारत नाही. बॉलिवूडमध्ये तो आपल्या दयाळू स्वभावासाठी ओळखला जातो. प्राण्यांची शिकार करण्याची त्याला आवड नाही. तो प्राण्यांवर प्रेम करतो, अशा शब्दांत प्रसिद्ध लेखक सलीम खान यांनी आपल्या मुलाची पाठराखण केली.

सलमान खानवर राजस्थान येथे काळविट हरणाची शिकार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी त्याने माफी मागावी, अशी मागणी बिश्नोई समाजाची आहे. त्यावर एका वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सलीम खान व्यक्त झाले.

सलीम खान म्हणाले की, मी सलमानला विचारले होते की काळविट हरणाची शिकार कोणी केली होती? तेव्हा तो म्हणाला होता की घटनास्थळी तो हजरच नव्हता. जेव्हा ही घटना घडली तेव्हा तो कारमध्येही नव्हता. शिवाय तो माझ्याशी खोटेही बोलणार नाही.

सलीम खान पुढे म्हणाले की, सलमानने कधीही कोणत्याही प्राण्याला मारलेले नाही. आम्ही कधी झुरळालाही मारलेले नाही. सलमान कोणाची माफी मागणार? आम्ही कधी बंदूकही चालवलेली नाही.



### सलमानने खरेदी केली बुलेटप्रूफ कार

मिळालेल्या माहितीनुसार, सुरक्षेच्या कारणास्तव सलमानने बुलेटप्रूफ कार खरेदी केली आहे. या कारची किंमत २ कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. आधीच्या कारप्रमाणेच सलमान खानने ही नवीन कारदेखील दुबईतून आयात केली आहे.

# पॉवर बकेट सफाईसाठी सव्वा कोटींचा खर्च

## भूमिगत पर्जन्य जलवाहिन्यांच्या सफाईसाठी वापर

**मुंबई :** मुंबई पालिकेतर्फे प्रामुख्याने भूमिगत पर्जन्य जलवाहिन्यांच्या साफसफाईसाठी पॉवर बकेट संयंत्र वापरले जाते. या संयंत्राच्या दोन जोड्या चालविण्यासाठी येत्या दोन वर्षांत सव्वा कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

मुंबई महापालिकेने या दोन जोडी सयंत्रांची खरेदी केलेली आहे. पण हे पॉवर बकेट चालवण्यासाठी महापालिकेकडे पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही. त्यामुळे हे काम कंत्राटी तत्त्वावर करून घेतले जाते. भूमिगत पर्जन्य जलवाहिनीच्या एका प्रवेशिकेतून पॉवर बकेट आत सोडून ते दुसऱ्या प्रवेशिकेतून ओढून बाहेर काढले जाते. या कामासाठी चार श्रमिक, दोन यंत्र चालक आणि एक पर्यवेक्षक असा कर्मचारी वर्ग एका जोडीवर लागतो. या संयंत्राद्वारे चांगल्या पद्धतीने गाळ काढला जातो. वर्षभरात सुमारे ६०० पाळ्या हे संयंत्र चालविले जाते. पावसाळी पाण्याचा निचरा योग्यरित्या होण्यासाठी पर्जन्य जलवाहिन्यांची सातत्याने साफसफाई केली जाते.

### एकूण दोन वर्षांचे कंत्राट

एकूण दोन वर्षांचे कंत्राट देण्यात आलेले आहे. या कामाचा एकूण खर्च एक कोटी २३ लाख ६२ हजार रुपये इतका आहे. लघुत्तम निविदाकार ठरलेल्या साज एंटरप्रायजेसला हे काम देण्यात आले आहे, अशी माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.

# मार्वेतील बेकायदा बांधकामे जमीनदोस्त

**मुंबई :** पालिकेची यंत्रणा निवडणुकीच्या कामात गुंतली असतानाच मुंबईत बेकायदा बांधकामे उभी राहत आहेत. मालाड पूर्वेकडील मार्वे बीच टी जंक्शन जवळ दोन हजार चौरस मीटरचे तीन गाळे दोन दिवसांत बांधण्यात आले. मात्र पालिकेच्या पी उत्तर विभागाला त्याची माहिती मिळताच ते जमीनदोस्त केले.

मार्वे किनाऱ्याजवळील टी जंक्शन येथे बेकायदा बांधकाम झाल्याची तक्रार पालिकेच्या विभाग कार्यालयाला मिळाली होती. पी उत्तर विभागाचे सहाय्यक अभियंता विजय मानकर यांनी सांगितले की, उप अभियंता कुबेर, शिंदे आणि प्रवीण मुलुक यांच्यावर बेकायदा बांधकाम जमीनदोस्त करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

> निवडणूक काळात भूमाफिया अधिक सक्रिय होतात. बेकायदा बांधकाम झाल्याची माहिती मिळताच संबंधितांना नोटीस बजावण्यात येते. मात्र निवडणूक संपताच भूमाफिया न्यायालयात धाव घेतात आणि कारवाईला स्थगिती मिळते. त्यामुळे बेकायदा बांधकाम झाल्याची तक्रार मिळताच पी उत्तर विभागाच्या माध्यमातून कारवाई करण्यात येते.
>
> - **सागर राणे**, कार्यकारी अभियंता, इमारत विभाग



## मुंबई महापालिकेकडून कुटुंबाच्या व्याख्येत सुधारणा

# पालिका प्रकल्पग्रस्तांच्या खापर पणतू-पणतीलाही नोकरी

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या कुटुंबातील सदस्यांना नोकरी देताना यापुढे बाधित व्यक्तीचा खापर पणतू, खापर पणतूची पत्नी आणि खापर पणतीलाही संधी दिली जाणार आहे. तशी सुधारणा कुटुंबाच्या व्याख्येत करण्यात आली आहे.

ही सुधारणा मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीबाहेरील पाणीपुरवठ्यासारखे प्रकल्प आणि भातसा बुडीत क्षेत्रातील प्रकल्प बाधितांसाठी करण्यात आली आहे. त्यांना नगरबाह्य विभागातील प्रकल्पग्रस्त असे म्हटले जाते. अशा प्रकल्प बाधितांच्या घरातील अनेक युवक-युवतींना पालिकेच्या नोकरीची संधी खुली झाली आहे, असे एका पालिका अधिकाऱ्याने सांगितले.

भातसई प्रकल्पासाठी १९७५ ते १९८७ दरम्यान पिसे ते येवई अशी नऊ किलोमीटर पट्ट्याची जमीन, जी ६० मीटर रुंद आहे, संपादित करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मुंबई - २ प्रकल्पा अंतर्गत येवई ते माजिवडा अशी सुमारे २४ किलोमीटर जमीन, जी ५० मीटर रुंद आहे, संपादित करण्यात आली आहे. मुंबई महापालिकेच्या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी बाधित झालेल्या वन जमिनीची हानी भरून काढण्यासाठी राज्यात इतर ठिकाणी झाडांची लागवड करण्यात आली आहे. पालघर जिल्ह्यातील गारगाई प्रकल्पासाठी बाधित होणाऱ्या दोन गावांबरोबरच आणखी चार गावांचे पुनर्वसन केले जाणार आहे. याच प्रकल्पाच्या वन जमिनीच्या पूर्ततेसाठी चंद्रपूर जिल्ह्यात सरकारने ४८८ हेक्टर जमीन देऊ केली आहे. आणखी १७१ हेक्टर जमीन खासगी क्षेत्रातून संपादित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या सर्वच ठिकाणच्या प्रकल्पग्रस्तांना पालिकेच्या या सुधारित कुटुंबाच्या व्याख्येचा लाभ मिळणार आहे.

### सुधारणा करण्याचे कारण

महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या तरतुदी लक्षात घेता स्थायी समिती आणि पालिका सभागृहाने २००८ मध्ये पुन्हा मार्गदर्शक तत्त्वे आणि कुटुंबाच्या व्याख्येत सुधारणा केली. कुटुंबाची व्याख्या नात आणि नातू यांपर्यंत आणली गेली. भातसा बुडीत क्षेत्राचे पुनर्वसनाचे उपजिल्हाधिकारी (ठाणे) यांनी केवळ २८ बाधितांना प्रकल्पग्रस्त म्हणून प्रमाणित केले आहे. त्याबाबत स्थायी समिती आणि पालिकेने २०२० मध्ये विशेष बाब म्हणून कुटुंबाची व्याख्या सुधारली होती. महसूल आणि वन विभागाच्या २ मे २०१६ च्या शासन निर्णयातील अट क्रमांक तीननुसार लाभाच्या हस्तांतरणासाठी प्रकल्प बाधित कुटुंबाची व्याख्या पुढील पिढीतील नातू-नातीच्या पुढे खापर पणतू, त्याची पत्नी तसेच खापर पणतीपर्यंत सुधारण्यात आली होती.

### व्याख्येत नेमकी सुधारणा काय?

संबंधित प्रकल्पाच्या आस्थापनेवरील वर्ग तीन आणि वर्ग चारमधील नोकऱ्यांसाठी प्रकल्प बाधित कुटुंबातील एका सदस्याला नोकरीत सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. अर्थात हे प्राधान्य राखीव जागांच्या सापेक्ष असते. आतापर्यंतच्या कुटुंबाच्या व्याख्येत बाधित व्यक्तीचा विवाहसाथी आणि बाधित व्यक्तीबरोबर राहत असणारा आणि तिच्यावर अवलंबून असणारा तिचा मुलगा, विवाहित किंवा अविवाहित मुलगी किंवा भाऊ किंवा बहीण यांचा समावेश होत असे. तसेच सून किंवा नातू किंवा नात (यामध्ये मुलीच्या मुलाचा आणि मुलीचाही समावेश होतो) आणि दत्तक मुलगा किंवा मुलगी यांचाही समावेश होत असे. आता सुधारित व्याख्येनुसार कुटुंब म्हणून वरील सर्व सदस्यांबरोबरच खापर पणतू किंवा खापर पणतूची पत्नी आणि खापर पणती यांचाही समावेश करण्यात आला आहे.

दैनिक झुंजार जनता


४

मंगळवार दि .२२/१०/२०२४





# विरंगुळा



## बालोद्यान



**एकनाथ आव्हाड**

"ए आई, मला बघ आज शाळेत बक्षीस मिळालंय." घरात पाय टाकल्याबरोबर राजूने आईला आवाज दिला, पण आईऐवजी त्याच्या ताईने म्हणजे सुमानेच खूश होऊन विचारलं, "बक्षीस..? कुठंय? अरे, दाखव तरी." आई स्वयंपाक खोलीतून बाहेर येत म्हणाली, "व्वा..! बक्षीस मिळालं होय, मग छानच झालं की. अरे, पण कशाबद्दल मिळालंय बक्षीस?"

"अगं, तुला काल सांगितलं नव्हतं का, आज शाळेत शंभर मीटर धावण्याची स्पर्धा होती ती. त्याच स्पर्धेत मी भाग घेतला होता आणि चक्क पहिला आलोय. त्याबद्दल आमचे पी.टी.चे शिक्षक भागवत सरांनी बक्षीस दिलंय मला."

बाळूने दप्तरातून मेडल आणि रंगीत कागदात गुंडाळलेली एक चौकोनी भेटवस्तू बाहेर काढली. मेडल त्यानं आईच्या हातात दिलं. आणि भेटवस्तू ताईच्या हातात दिली. आईने ते मेडल राजूच्या गळ्यात घातलं आणि टाळ्या वाजवल्या. राजूला एकदम भारी वाटलं. तो आनंदला. त्याच्या ताईने त्या भेटवस्तूवरचा रंगीत कागद काढला. आत एक पुस्तक होतं. नवकोरं पुस्तक. पुस्तकाचं नाव होतं 'बोधाई'. ताईने पुस्तकाची पानं चाळली. गोष्टीरूप कविता होत्या त्यात. पुस्तक पाहून राजू फार खूश दिसला नाही. तो आईला म्हणाला, "बघ ना आई. खेळाडूला मेडलसोबत एखादी ट्रॉफी द्यायची की नाही; तर शाळेने काय दिलं तर एक पुस्तक."

आई म्हणाली, "अरे असू दे की. पुस्तकांना कधी कमी समजू नये. पुस्तकं आपल्याला चांगला मार्ग दाखवतात. आपल्या मनात जिद्द निर्माण करतात."

यावर राजू काही बोलला नाही. तो तिथून उठला. दप्तर नेहमीच्या जागेवर ठेवून गळ्यातलं मेडल काढून ते त्याने कपाटात ठेवून दिलं. गणवेश बदलला. घरातले दुसरे कपडे घातले. हातपाय तोंड धुतले. तोपर्यंत सुमाताईनं त्या 'बोधाई' पुस्तकाची काही पानं झरझर वाचून काढली. तिला पुस्तक फार आवडलं. सुमा नववीत, तर राजू आठवीत सरस्वती विद्यालयात शिकत होता. सुमाला वाचनाची, तर राजूला खेळाची आवड होती.

आईने दोघांनाही गरम गरम पोहे आणून दिले. पोहे खात खात सुमा राजूला म्हणाली, "अरे राजू, छान आहे बरं हे पुस्तक. यातल्या प्रत्येक कवितेत एक छानशी गोष्ट गुंफलेली आहे आणि ही गोष्ट आपल्याला काही ना काही चांगलं सहज सांगून जाते."

राजू काहीसा नाराजीनेच म्हणाला, "मला नको पुस्तकबिस्तक. मला पुस्तकाऐवजी हवी होती ट्रॉफी. ती ट्रॉफी कशी, सगळ्यांना दाखवता आली असती. मिरवता आली असती. आपल्या काचेच्या कपाटात किती मस्त दिसली असती. येता-जाता सगळ्यांना ती पाहता आली असती. किती भारी वाटलं असतं. मला ना, पुस्तकं वाचायला जाम कंटाळा येतो. खेळायला मात्र कितीही सांग; खूप आवडतं मला. शाळेत कबड्डीचासुद्धा कॅप्टन आहे मी. आंतरशालेय कबड्डी स्पर्धेत दरवर्षी पहिलाच नंबर असतो आपल्या शाळेचा."

आई लगेच म्हणाली, "अरे हो, पण खेळ जेवढा महत्त्वाचा तेवढंच पुस्तकांचं वाचनसुद्धा महत्त्वाचं असतं."

सुमाही लगेच म्हणाली, "राजू अरे, पुस्तक एक असं गिफ्ट आहे, जे तुम्ही नेहमी नेहमी उघडू शकता."

राजूला काही कळेना. "म्हणजे?"

"अरे म्हणजे, पुस्तकं आपलं अंतरंग खुलं करतात. आपल्याशी ती भरभरून बोलतात."

"ए सुमाताई, तू असं कोड्यात नको बोलूस. नीट समजेल असं सांग काही."

"अरे बाबा, पुस्तकं सोबतीला असतात तेव्हा नव्या नव्या गोष्टी सांगतात. गोष्टी, कवितांतून चक्क आपल्याशी बोलतात."

पण राजूचं काही समाधान झालं नाही. त्याला वाटलं, या नुसत्या बोलण्याच्या गोष्टी. लवकरच आंतरशालेय कबड्डीच्या स्पर्धा सुरू झाल्या. राजूचा कबड्डीचा संघ या स्पर्धेत नेहमीप्रमाणे सहभागी झाला. राजूला वाटलं, याहीवर्षी या स्पर्धेत आपलाच संघ बाजी मारणार. आपणच ट्रॉफी पटकावणार. पण झालं भलतंच. ज्ञानेश्वर विद्यालयाचा कबड्डीचा संघ यावर्षी भरपूर तयारीनिशी स्पर्धेत सामील झाला होता आणि तोच संघ यावेळी जिंकला. नेहमीच बक्षीस जिंकायची सवय असल्यामुळे राजूला पराभव पचवणं कठीण गेलं. आपण आपल्या संघाचा कॅप्टन, आपल्यामुळेच आपला संघ हरला, असेही त्याच्या मनात आले. तो खूप निराश झाला. कबड्डीचा सराव करणं त्यानं बंद केलं. आता काही ना काही कारणं सांगून मैदानावर जायचंही तो टाळू लागला.

एका संध्याकाळी जेवणं झाल्यावर राजूने त्याला बक्षीस म्हणून मिळालेलं 'बोधाई' पुस्तक सहज हातात घेतलं. पुस्तकाची पानं चाळता चाळता तो एका कवितेपाशी येऊन थबकला. कविता वाचू लागला. कविता कसली, एक सुंदर तालकथाच होती ती. तो कविता वाचत गेला...

"पावसाचा एक थेंब,<br>
धरतीवर पडता पडता<br>
दुःखाचा सुस्कारा सोडत,<br>
म्हणाला रडता रडता<br>
म्हणे या मातीत पडून,<br>
मी नाहीसा होणार<br>
असं निरर्थक जीवन,<br>
वाट्याला माझ्या येणार<br>
असं म्हणता म्हणता<br>
तो, समुद्राच्या शिंपल्यात पडला<br>
त्याबरोबर तो शिंपला, खोल<br>
पाण्यात जाऊन दडला<br>
काही वेळाने त्या थेंबाचा,<br>
झाला मौल्यवान मोती<br>
आपले नवे रूप पाहून,<br>
थेंब हरखला किती<br>
थेंबाला कळून चुकले,<br>
ना रडत कुढत जगावे<br>
आनंदाचे गाणे सदा,<br>
ओठी असू द्यावे..!"

कथाकाव्य वाचून राजू हरखला. त्याचे डोळे लकाकले. त्याला वाटलं, खरंच, कशाला आपण रडावे, कुढावे. निराशेत बुडावे. आनंदाचे गाणे सदा, ओठी असू द्यावे.

ती कविता वाचून, त्याला काय वाटलं कुणास ठाऊक. पण दुसऱ्या दिवसापासून तो पुन्हा कबड्डीच्या सरावाला जाऊ लागला. मैदानावर दिसू लागला. त्याला कबड्डीची जोमाने प्रॅक्टिस करताना पाहून त्याची मित्रमंडळी खूश झाली.

यावेळी आणखी एक गोष्ट तो नव्याने करायला शिकला. ती म्हणजे रोज संध्याकाळी झोपण्यापूर्वी एखादं पुस्तक तो हमखास वाचायला घ्यायचा. फावल्यावेळी त्याच्या हातात पुस्तक दिसायला लागलं. याचा घरात सर्वांनाच आनंद झाला. हळूहळू त्याची वाचनाची आवड वाढत गेली. ताईची गोष्टींची पुस्तकंही त्यानं झपाटल्यासारखी वाचून काढली. पुस्तकं आपल्याशी बोलतात, हे ताईचं बोलणं आता त्याला पुरेपूर पटलं होतं. त्याची वाचनाची आवड पाहून बाबांनी बालसाहित्याची नवीन पुस्तकं घरी विकत आणली. घरातली पुस्तकांची संख्या हळूहळू वाढत चालली. कथा, कविता, कादंबरिका, चरित्रे केवढ्या तरी प्रकारची पुस्तकं घरात आली.

मग पुस्तकांसाठी घरात एक खास कपाट बनवून घेतलं गेलं.

वाचता वाचता राजू कधी लिहू लागला हे त्याचे त्यालाही कळले नाही. पुस्तकं एका चांगल्या मित्राप्रमाणे आपल्या अपयशांवर मात करण्यास तसेच आपल्या मनाला आकार देण्यास मदतच करीत असतात, हे आता पुरेपूर पटलं होतं त्याला.

जागतिक पुस्तक दिन जवळच येऊन ठेपला होता आणि योगायोगाने राजूच्या वाढदिवसाची तारीखही तीच होती. तेव्हा राजूने ठरवलं, वर्गातील मुलांना रिटर्न गिफ्ट म्हणून आता यापुढे पुस्तकच भेट म्हणून द्यायचं.

कारण पुस्तकं करतात, डोक्याला सुपीक, आनंदाचंही येतं, भरपूर पीक."

**(साहित्य अकादमी बालसाहित्य पुरस्कारप्राप्त लेखक.)**

## खुल जा सिम सिम



**ज्योती कपिले**

# अपंगत्वावर मात



Hi friends! कसे आहात? मी मजेत आहे. तुम्हाला गोष्टी आवडतात म्हणून आज मी तुमच्यासाठी घेऊन आले आहे बबन शिंदे या शिक्षक लेखकाने लिहिलेल्या "आगळ्या वेगळ्या कथा" हे पुस्तक.

या पुस्तकात एकूण दहा कथा आहेत आणि आजच्या पुस्तकातील सर्व गोष्टी मला आवडल्या आहेत. तुम्हाला सुद्धा आवडतील. त्यातली एक कथा सांगते. शीर्षक आहे "खरंच मी अपंग नाही!"

एक छोटी वाडी असते. त्यात नामदेव नावाचा मुलगा राहत होता. पण तो अपंग असल्याकारणाने वाडीतील इतर मुलं कधीच त्याला खेळायला घेत नसत. मुलं खेळताना बघून त्याला खूप आनंद व्हायचा. मुलं खेळताना कधी त्यांचा चेंडू, विटी नामदेवजवळ आली तर ती त्या मुलांना परत करायला तो जायचा तेव्हा मुलं त्याला ओरडत, चिडवत. याचे त्याला खूप वाईट वाटायचं. एक दिवशी शनिवारची सुट्टी असते. नामदेवचा एक मित्र असतो आनंद. त्याच्या शेजारीच राहत असतो. आनंद आणि त्याचे काही मित्र रानात बोरं गोळा करायला चाललेले असतात. ते बघून नामदेव त्यांना विचारतो, 'की मी येऊ का तुमच्याबरोबर?' तर ते म्हणतात की, 'बिल्कूल नाही. तुला कोण सांभाळणार? तू तर खायला काळ आणि भुईला भार आहेस.' ते ऐकून नामदेवला खूप वाईट वाटतं. ती मुलं रानात बोर आणायला जातात, तर नामदेव आपल्या झोपडीकडे जायला निघतो. तेवढ्यात आनंदाच्या झोपडीकडे त्याचं लक्ष जातं. तर तिथे अंगणात आनंदाचा लहान भाऊ किसन खाटेवर झोपलेला असतो आणि आनंदाचे आई-वडील बाहेर गेलेले असतात. त्याच्यामुळे खरं तर लहान भावाला सांभाळणं ही आनंदाची जबाबदारी होती. पण तो तर आपल्या मित्रांसोबत निघून जातो. नामदेव आपल्या झोपडीच्या बाहेरच बसलेला असतो. तेवढ्यात काय होतं त्याला झोपडीच्या मागे झुडपात सळसळ असा आवाज येतो. तेव्हा नामदेव एक खडा घेतो व पटकन त्या झुडपाकडे मारतो, पण परत आवाज आल्यावर त्याला लक्षात येतं की तिकडे कुठलं तरी जंगली जनावर असणार. म्हणून तो आपल्या झोपडीत जाणार तेवढ्यात त्याचे लक्ष शेजारच्या अंगणात जातं. तिकडे किसना शांत झोपलेला असतो. बरं, तो लहान आहे तर पळू शकणार नाही. तेवढ्यात त्याला एक सगुणा नावाची मुलगी दिसते. तो म्हणतो की, 'सगुणा, आपण किसनाला उठवून आणूया. झोपडीच्या मागे जंगली जनावर असावं.' तर तीच घाबरून म्हणते, 'मी जाते, तू पण पळ आणि आनंद तर तुला नेहमी त्रास देतो, तर तू कशाला त्याच्या भावाला वाचवतो?' नामदेव म्हणतो, 'आनंदाने मला चिडवलं तर चिडवू दे. पण मी किसनाला एकटं सोडून पळू शकत नाही.' पण घाबरलेली सगुणा तिकडून पळून जाते. मग नामदेव त्याच्या खाटेची दोरी काढतो, त्याचा फास बनवतो आणि किसन ज्या झाडाखाली झोपलेला असतो त्या झाडावर मोठ्या मुश्किलीने चढतो. तेवढ्यात त्याला लांडगा येताना दिसतो. मग तो सावध होऊन लांडग्याच्या दिशेने बनवलेला फास फेकतो. त्या फासात बरोब्बर लांडग्याचे पुढचे पाय अडकतात आणि तो झाडाला लोंबकळायला लागतो, मग नामदेव मोठ्याने ओरडायला लागतो, 'वाचवाss वाचवा" आणि मग तो आवाज ऐकून जवळच्या शिवारात काम करणारे लोक धावत येतात आणि नामदेवने पकडलेला लांडगा बघून आश्चर्यचकित होतात. त्या लांडग्याने आत्तापर्यंत बऱ्याच शेळ्या-बकऱ्या लंपास केलेल्या असतात आणि आज एका अपंग मुलाने त्या लांडग्याला पकडून दिलेलं असतं. सगळे त्याची वाहवा करायला लागतात आणि म्हणतात, 'अरे धडधाकट माणसाला जमणार नाही ते काम तू तुझ्या बुद्धीने केलं! खरंच तू किती हुशार आहेस.' आणि मग तेवढ्यात आनंदा पण येतो आणि त्याच्या लक्षात येतं की, नामदेवने आपल्या भावाला वाचवलं आहे. तो नामदेवची क्षमा मागतो. त्याला म्हणतो की, 'तुला मी अपंग आहे म्हणून चिडवत होतो आणि तुझ्याबरोबर खेळत नव्हतो, पण खरंतर तू किती मोठा पराक्रम केलास, माझ्या भावाचा जीव वाचवलास. मला माफ कर.' तेव्हा नामदेव त्याला माफ करतो. सगळे लोक म्हणतात, 'आता या लांडग्याला आपण मारून टाकूया.' पण नामदेव म्हणतो, 'नको. आधीच जंगलात प्राणी कमी झालेत. त्यापेक्षा आपण वनखात्याला बोलवूया आणि हा लांडगा त्यांच्या हवाली करूया.' मग फॉरेस्ट ऑफिसर येतात आणि नामदेवचे कौतुक करतात. म्हणतात की, 'नामदेवला कोण अपंग म्हणेल? याने तर हिमतीने, हुशारीने लांडगा पकडला.' मग नामदेवलाही स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव होते आणि तो म्हणतो, 'खरंच मी अपंग नाही!' मित्रांनो, अचानक आलेल्या संकटाला हिमतीने सामोरं जाणं खूपच महत्त्वाचं असतं आणि उगीचच कोणाचीही टर उडवणं अगदी वाईट असतं. पण पुस्तकं वाचणारी मुलं समंजस असतात हे मला माहिती आहे. तर जरूर हे पुस्तक मिळवून वाचा आणि समृद्ध व्हा.

**(लेखिका बाल साहित्यिक आहेत.)**

## बुंदी रायता

**तुम्हाला** बुंदी रायता खायला आवडत असेलच. बुंदीचा रायता शरीरात थंडपणा देतो. चला, आपण मोठ्यांबरोबरच लहान मुलांनाही आवडणारा बुंदी रायता तयार करूया.

**बुंदी रायता बनवण्यासाठी साहित्य बघा :-**

**एक तयार खारी बुंदी पॉकेट तर रायत्यासाठी** :- दही - १ कप, जिरे पावडर - १/४ टीस्पून, काश्मिरी लाल तिखट - १/४ टीस्पून, हिरवी कोथिंबीर चिरलेली - २ चमचे, १ कप गरम पाणी, मीठ - १/४ टीस्पून.



**कृती** :- तयार बुंदी एका कप गरम पाण्यात टाका आणि १० मिनिटांनंतर बुंदीला पाण्यातून काढून हलकेच पिळून बाजूला ठेवा. आता एका भांड्यात एक कप दही टाका आणि फेटून घ्या. यानंतर त्यात जिरेपूड, तिखट आणि चवीनुसार मीठ घालून मिक्स करा. सर्व साहित्य टाकल्यानंतर दही चांगले फेटून घ्या. यानंतर भिजवलेली बुंदी दह्यात घाला. वरून हिरवी कोथिंबीर सजवा. आरोग्यदायी बुंदी रायता तय्यार! आता तुम्ही खा आणि घरातील सर्वांना द्या. Sharing is Always Caring!

## बालमैफल



**सुरेश वांदिले**

# 'लाटे'चं गणित!



मालकीणबाई दोन दिवसांसाठी बाहेर गेल्या. "घराबाहेर जाऊन आगावूपणा केलास तर तुला हाकलून लावीन", अशी तंबी त्यांनी मार्गारिटला दिली. मालकीणबाईचं हे बोलणं रॉबिन्सनला आवडलं नाही. लपलेल्या जागेतून बाहेर पडून मालकीणबाईच्या पायाला चावा घ्यावा असं तीव्रतेन वाटून तो चुळबूळ करू लागला. मावशीचं त्याच्याकडे लक्षं गेलं. तिने गप्प बसण्याचा इशारा त्याला केला.

मालकीणबाई घराबाहेर पडताच, मार्गारिटने रॉबिन्सनच्या शेपटीला तोंडात पकडून बाहेर खेचलं.

"मावशे, तुझे दात आहेत का खिळे! चांगलेच रुततात. कशाला मला अशी शिक्षा देतेस?"

"गधड्या, मालकीणबाई घरात असताना काय चालली होती तुझी चुळबूळ-पुळबूळ! त्यांच्या लक्षात आलं असतं तर त्यांनी मलाच तुझा काटा काढायला सांगितला असता. मग कोणत्या भावात गेला असतास?"

"ती खाष्टबाई तुला वाट्टेल ते बोलत होती, ते मला सहन होत नव्हतं."मामा मिशी फेंदारून म्हणाला. त्याला जवळ घेत मावशी म्हणाली,

"रॉब्या, बाई रागिष्ट असल्या तरी अधूनमधून माझ्यासाठी प्रेमिष्टपण बनतात. तेवढं पुरेसं आहे माझ्यासाठी."

"मावशे तू, त्या खाष्टीचं खरंच ऐकणार का?"

"छे रे! रॉब्या, या दोन दिवसांत आपण धम्माल करू."

"मग मावशे, बँडस्टँडजवळच्या मन्नत बंगल्यात जायचं का? तिथे म्हणे शाहरुख माझ्या आतेभावाची नि तुझ्या मावस बहिणीची राजेशाही काळजी घेतो. त्यांच्यासोबत आपणही दोन दिवस घेऊ मस्त मेजवाणी, लज्जतदार हैदराबादी टिंगटाँगी बिर्याणी." बिर्याणीचं नाव कानावर पडताच मावशीच्या तोंडाला पाणी सुटलं.

मालकीणबाईंच्या तंबीकडे दुर्लक्ष करुन मग मावशीने, रॉबिन्सनसह बँडस्टँडकडे प्रस्थान केले. कडेकडेनं जात ते मन्नतजवळ पोहचले. पण बंगल्यात जाण्यासाठी कुठेही फट दिसेना. दोघांनी सुरक्षारक्षकांची नजर चुकवून आत शिरायचा प्रयत्न केला. तो प्रयत्न सुरक्षारक्षकांनी हाणून पाडला. दोघांनी तिथून धूम ठोकली नि बाजूच्या समुद्रकिनाऱ्यावरील काळ्या दगडांच्या आडोशाला जाऊन ते बसले. समुद्राच्या थंडगार हवेनं दोघांनाही बरं वाटलं. मावशीने एका बुट्टेवाल्याचं लक्षं नाही बघून हळूच बुट्टा लंपास केला. मामा आणि मावशी दोघेही बुट्ट्यावर ताव मारू लागले. अचानक, आतापर्यंत शांत वाटणाऱ्या समुद्राच्या पाण्याचा आवाज वाढू लागला. पाणी वर-खाली होऊ लागलं नी दुरून पाण्याचा लोंढा त्यांच्या बाजूने येऊ लागला. दगडावर बसलेले मनुष्यप्राणी तिथून लगबगीने उठून किनाऱ्यापासून दूर गेले. मामा आणि मावशीही पळाले. रस्त्यावर एका झाडाचा आडोसा बघून समुद्राच्या पाण्याच्या लोंढ्याकडे बघू लागले.

"मावशे, त्या दुष्ट मालकीणबाईने तर पाठवलं नसेल या पाण्याच्या लोंढ्याला. घरी गेल्यावर चांगलाच इंगा दाखवतो बघ."

"गधड्या, मालकीणबाईंना उगाच यात ओढू नकोस."

"पण मग, कुणाचा तरी यात हात असल्याशिवाय का इतका मोठा लोंढा अचानक आला आपल्या दिशेने."

"माम्या, आभाळातील चांदोबाची ही करामत!"

"त्याचं तर आपण काहीच वाईट केलं नाही. मग, कशाला त्याने पाठवला हा लोंढा, आपल्याला गिळायला!"

"त्याने हे मुद्दाम केलं नाही."

"मावशे, तू म्हणालीस ही चंद्राची करामत. तुला गं कसं कळलं?

"मावशीला ठाऊक नाही अशी एकतरी गोष्ट आहे का या जगात?"

"सॉरी मावशे, हे मी विसरुनच जातो. मग सांग की याचं रहस्य मला." मामा म्हणाला.

"माम्या, आता जो लोंढा वेगात त्याला भरती म्हणतात. सध्या समुद्राची भरती सुरु झालीय. म्हणून या लाटांवर लाटा किनाऱ्याकडे येताहेत." समुद्राकडे बघत मावशी सांगू लागली.

"यात त्या चांदोबाची करामत कशी?"

"आपली पृथ्वी ही अवकाशात फिरत असते नि हा चांदोबा तिच्याभोवती फिरतो. दोघेही गोलमगोल! या दोघांना एकमेकांच्या गुरुत्वाकर्षणाची ओढ जाणवत राहते."

"म्हणजे?"

"म्हणजे असं की, पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाची ओढ चंद्राला त्याच्या विवक्षित कक्षेतून फिरायला लावते."

"ही विवक्षितची काय भानगड... स स सॉरी गणित..." मामा दात चावत म्हणाला.

"विवक्षित म्हणजे, ठरलेल्या किंवा निश्चित असलेल्या..."

"ओके, असं सोप्पं सांगना."

"तर, चंद्राच्या गुरुत्वाकर्षणाची ओढसुद्धा पृथ्वीला जाणवते. त्यामुळे पृथ्वी चंद्राच्या दिशेने ओढली जाते."

"पुढे काय होतं?"

"या गुरुत्वाकर्षणाच्या ओढीची तीव्रता दोन गोष्टींवर अवलंबून असते."

"कोणत्या?"

"पहिली म्हणजे, या गोलांचं वस्तुमान आणि दुसरं म्हणजे या गोलांमधलं अंतर. वस्तुमान जास्त असल्यास ओढ जास्त, पण चांदोबाचं वस्तुमान पृथ्वीपेक्षा कमी असल्यानं त्याची ओढ कमी. शिवाय पृथ्वीची जमीन टणक असल्याने या ओढीचा प्रभाव जमिनीवर फारसा पडत नाही."

"याचाच अर्थ समुद्राच्या पाण्यावर या ओढीचा प्रभाव अधिक पडत असणार." मामा टुणकन उडी मारत म्हणाला.

"अगदी बरोबर, पृथ्वीवरचं समुद्राचं पाणी लवचिक असल्यानं ते चंद्राकडे ओढलं जाऊन त्याचा फुगवटा होतो. याला भरती म्हणतात."

"मावशे, हे तर गणितच म्हणायचं."

"पण हे अर्धवटच गणित झालं."

"हो का? मग पूर्ण कर की"

"मामू, गुरुत्वाकर्षणाची ओढ ही अंतरावर अवलंबून असते. हे अंतर दुपटीने वाढलं की ओढ चारपटीने कमी होते. चंद्र पृथ्वीच्या ज्या भागाला असतो त्यापासून त्याचं अंतर कमी नि विरुद्ध बाजूला अंतर जास्त असतं. त्यामुळे विरुद्ध बाजूला गुरुत्वाकर्षणाची ओढ कमी होते. या दोन्ही बाजूला असणारी ओढ यामध्ये बराच फरक पडतो. त्यामुळे विरुद्ध बाजूचं समुद्राचं पाणी चंद्रापासून दूर ओढलं जातं. त्या बाजूलासुद्धा फुगवटा येऊन तिथे भरती येते. या दोन्ही बाजूला फुगवटा आल्यावर त्याच्याशी काटकोनात असणाऱ्या भागातील पाणी ओसरतं. चांदोबापासून अंतर सारखं असल्याने या दोन्ही टोकांना भासणारी गुरुत्वाकर्षणाची ओढ समानच असते. तेथील पाणी कमी झाल्यामुळे किंवा ओसरल्यामुळे ओहोटी येते.

"वाव! वंडरफूल, किती गं हे कूल-कूल!"

"मामू, आपली पृथ्वी स्वतःभोवती फिरताना तिच्या वेगवेगळ्या बाजू कधी चंद्राच्याजवळ येतात, तर कधी चंद्रापासून दूर जातात. त्यामुळे भरतीची जागाही बदलते. अर्धा दिवस संपला की पुन्हा त्याच ठिकाणी भरती येते. असं हे भरती-ओहोटीचं गणित सारखं सुरू राहतं."

" मग मावशे, ही करामत करणं, सूर्योबाला का शक्य नाही?"

"गड्या, सूर्योबाच्या गुरुत्वाकर्षणाची ओढ चांदोबापेक्षा अधिक असली तरी, पृथ्वी सूर्यापासून खूपच दूर असल्याने, त्याच्या दिशेने असणाऱ्या आणि विरुद्ध बाजूंवर या ओढीचा फार फरक पडत नाही."

"मस्त मस्त!"

"काय ते?"

"मावशे, शाहरूखच्या बंगल्यातील बिर्याणी मिळाली नाही हे बरंच झालं?

"कां रे?"

"बिर्याणी पोटात गेल्यावर निद्रादेवीच्या जाळ्यात सापडून ही भरती-ओहोटीची गंमतजंमत घालवून बसलो असतो ना." मामा जिभल्या चाटत म्हणाला. त्याला काय म्हणायचंय हे मावशीच्या लक्षात येताच तिने इकडेतिकडे बघितलं. लाटांमुळे एकदोन पापलेट किनाऱ्यावर आल्याचं मावशीला दिसलं. तिने झर्रदिशी उडी मारून झपदिशी पापलेट पकडून मामासमोर ठेवला. या मेजवाणीत दंग होऊन दोघेही लाटा मोजण्यात रंगून गेले.

**(लेखक ज्येष्ठ बालसाहित्यिक आहेत.)**

Printed By, Published By, on behalf of: **Ismail Salim Shaikh,** Printed at Meher Creative Graphics, Chistiya Colony, N-5, Cidco, Tq. & Dist. Aurangabad 431003 (Maharashtra) and published from **Zunjar janta** gulshan nagar, Sillod, Tq. Sillod, Dist. Aurangabad - 431112 (Maharashtra), Editor - **Ismail Salim Shaikh,** Mob:- **8180068180** E-mail: zunjarjanta@gmail.com **RNI NO. MAHMAR/2022/82590**

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक **इस्माईल सलीम शेख** यांनी मेहेर क्रिएटिव्ह ग्राफिक्स चिश्तिया कॉलोनी -५ सिडको औरंगाबाद - ४३१००१ (महाराष्ट्र) येथे छापून, **झुंजार जनता,** कार्यालय गुलशन नगर सिल्लोड ता. सिल्लोड जिल्हा औरंगाबाद -४३१११२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - **इस्माईल सलीम शेख** संपर्क ८१८००६८१८० E-mail: zunjarjanta@gmail.com **RNI NO. MAHMAR/2022/82590**